श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## युगलगीत



रोम रोम श्रीकृष्ण में डूबा, अंग अंग से उठती प्रीत।
अद्भुत छटा निहार प्रभु की, गोपियां गाती युगल गीत।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**
**दशमः स्कन्धः**
**॥ अथ पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥**

**श्रीशुक उवाच**

**गोप्यः(ख्) कृष्णे वनं(यँ) याते, तमनुद्रुतचेतसः ।**
**कृष्णलीलाः(फ्) प्रगायन्त्यो, निन्युर्दुःखेन वासरान् ॥ 1॥**

तमनुद्रु+ तचेतसः, निन्युर्+ दुःखेन

श्रीशुकम्हणतात-श्रीकृष्ण वनात जात,तेव्हा गोपींचे चित्त सुद्धा त्यांच्याबरोबरच जात असे .श्रीकृष्णांच्या लीलांचे गायन करीत त्या आपले दिवस कष्टाने घालवीत

**गोप्य ऊचुः**

**वामबाहुकृतवामकपोलो,**

वल्गितभ्रुरधरार्पितवेणुम् ।

कोमलाङ्गुलिभिराश्रितमार्ग(ङ्),

गोप्य ईरयति यत्र मुकुन्दः ॥ 2॥

वाम+ बाहुकृतवा+ मकपोलो ,वल्गित+ भ्रुरधरार्+ पितवेणुम् ,

कोमला(ङ्)+ गुलिभिरा+ श्रितमार्ग(ङ्)

व्योमयानवनिताः(स्) सह सिद्धैर्-

विस्मितास्तदुपधार्य सलज्जाः ।

काममार्गणसमर्पितचित्ताः(ख्),

कश्मलं(यँ) ययुरपस्मृतनीव्यः ॥ 3॥

व्योमया+ नवनिताः(स्), विस्मितास्+ तदु+ पधार्य ,

काम+ मार्गण+ समर्पित+ चित्ताः(ख्), ययु+ रपस्+ मृतनीव्यः

गोपी म्हणत -सख्यांनो !श्रीकृष्ण जेव्हा आपला डावा गाल डाव्या हाताच्या बाजूकडे वळवून भुवया नाचवीत ,बासरी तोंडाला लावून आपली सुकुमार बोटे त्यांच्या छिद्रांवर फिरवून मधुरतान छेडतात ,तेव्हा आकाशात पतींसह विमानात बसून आलेल्या सिद्ध पत्न्या ती तान ऐकून प्रथम आश्चर्यचकित होतात .नंतर त्यांचे चित्त कामबानांनी युद्ध होते .त्यामुळे लज्जित झालेल्या त्या पाहता पाहता बेभान होतात .इतक्या की त्यांना वस्त्राचीही शुद्ध राहात नाही.(अशा कृष्णांचा विरह आम्ही कसा बरे सहन करावा ? )

हन्त चित्रमबलाः(श्) शृणुतेदं(म्),

हारहास उरसि स्थिरविद्युत् ।

नन्दसूनुरयमार्तजनानां(न्),

नर्मदो यर्हि कूजितवेणुः ॥ 4॥

चित्र+ मबलाः(श्), नन्द+ सूनु+ रयमार्त+ जनानां(न्)

वृन्दशो व्रजवृषा मृगगावो,

वेणुवाद्यहृतचेतस आरात् ।

दन्तदष्टकवला धृतकर्णा,

निद्रिता लिखितचित्रमिवासन् ॥ 5 ॥

वेणु+ वाद्य+ हृतचेतस, दन्त+ दष्ट+ कवला, लिखित+ चित्र+ मिवासन्

अग सख्यांनों! हे आश्चर्य तर ऐका! हे मंदनंदन जेव्हा दुःखितांनाही आनंद देणारा वेणू वाजवू लागतात, तेव्हा त्यांचे हास्य हाच त्यांच्या छातीवर रूळणारा हार बनतो आणि चंचल लक्ष्मी तेथे स्तब्ध होवून राहाते. त्या वेणु वादनाने चित्त आकर्षित झालेले व्रजातील बैल,गाई आणि हरीण यांचे कळप मुग्ध होवून जातात. दातांनी चावत असलेला गवताचा घास त्यांच्या तोंडातच असतो . दोन्ही कान टवकारून ते असे उभे राहतात की,जणू काही ते झोपी तरी गेले आहेत किंवा भिंतीवर काढलेली ती चित्रे तरी आहेत .

बर्हिणस्तबकधातुपलाशैर्-

बद्धमल्लपरिबर्हविडम्बः ।

कर्हिचित् सबल आलि स गोपैर्-

गाः(स्) समाह्वयति यत्र मुकुन्दः ॥ 6॥

बर्हिणस्+ तबकधा+ तुपलाशैर्,बद्ध+ मल्ल+ परिबर्ह+ विडम्बः, समाह्+ वयति

तर्हि भग्नगतयः(स्) सरितो वै,

तत्पदाम्बुजरजोऽनिलनीतम् ।

स्पृहयतीर्वयमिवाबहुपुण्याः(फ्),

प्रेमवेपितभुजाः(स्) स्तिमितापः ॥ 7॥

भग्न+ गतयः(स्), तत्पदाम्+ बुजरजोऽ+ निलनीतम्

स्पृहयतीर्+ वयमिवा+ बहुपुण्याः(फ्), प्रेम+ वेपित+ भुजाः(स्)

गड ! ते नंदलाल जेव्हा मस्तकार मोरपंखांचा मुकूट घालून रंगीतधातूंनी आपले शरीर रंगवतात आणि पानांनी असे सजवून घेतात की, जसा एखादा पहिलवान असावा आणि नंतर जेव्हा बलराम आणि गोपालांसह बासरी वाजवून गाईंना साद घालतात, त्यावेळी त्या नादाने नद्यांचे वाहाणे थांबते . त्यांना असे वाटते की, श्रीकृष्णांच्या चरणांची धूळ वाऱ्याने उडवून आपल्याकडे आणावी. परंतु त्यासुद्धा आमच्या सारख्याच अभागिनी आहेत. जसे श्रीकृष्णांना आलिंगन देते वेळी आमचे हात थरथरतात आणि नंतर जड होतात, त्याचप्रमाणे त्यासुद्धा तरंगरूप हात प्रेमाने वर उचलू पाहतात ' परंतु पुन्हा असहय होवून स्थिर राहतात .

अनुचरैः(स्) समनुवर्णितवीर्य,

आदिपूरुष इवाचलभूतिः ।

वनचरो गिरितटेषु चरन्तीर्-

वेणुनाऽऽह्वयति गाः(स्) स यदा हि ॥ 8॥

सम+ नुवर्णि+ तवीर्य ,इवा+ चलभूतिः, वेणुनाऽऽह्+ वयति

वनलतास्तरव आत्मनि विष्णुं(वँ),

व्यं(ञ्)जयन्त्य इव पु*ष्पफलाढ्याः ।

प्रणतभारविटपा मधुधाराः(फ्),

प्रेमहृ*ष्टतनवः(स्) ससृजुः(स्) स्म ॥ 9॥

वनलतास्+ तरव, पुष्प+ फलाढ्याः, प्रणत+ भार+ विटपा ,प्रेम+ हृष्ट+ तनवः(स्)

गोपाल ज्यांच्या लीलांचे गायन करीत असतात,ते आधी पुरुषासारखे स्थिर ऐश्वर्या संपन्न श्रीकृष्ण जेव्हा वृंदावनामध्ये विहार करीत असताना बासरी वाजवून पर्वतावर चरणाऱ्या गाईंना त्यांच्या नावांनी साद घालतात,त्यावेळी वनातील वृक्ष आणि वेली आपल्या अंतरंगात भगवान विष्णूंचे अस्तित्व सूचित करीत फुलांनी आणि फळांनी बहरून येतात ,त्यांच्या भाराने फांद्या वाकून जमिनीवर टेकतात.प्रेमाने त्यांचा रोम-अन् रोम प्रफुल्लित होतो .आणि ते मधाच्या धारांचा वर्षाव करू लागतात .

दर्शनीयतिलको वनमाला-

दि*व्यग*न्धतुलसीमधुमत्तैः ।

अलिकुलैरलघुगीतमभीष्ट-

माद्रियन् यर्हि स*न्धितवेणुः ॥ 10॥

दर्शनी+ यतिलको , दिव्यगन्ध+ तुलसी+ मधुमत्तैः,

अलिकुलै+ रलघुगी+ तमभीष्ट ,सन्धि+ तवेणुः

सरसि सारसहं(म्)सविह*ङ्गाश्-

चारुगीतहृतचेतस ए*त्य ।

हरिमुपासत ते यतचित्ता,

ह*न्त मीलितदृशो धृतमौनाः ॥ 11॥

सारस+ हं(म्)स+ विहङ्गाश्, चारु+ गीतहृत+ चेतस ,हरि+ मुपासत, मीलि+ तदृशो

विश्वातील सुंदारांहून सुंदर असणाऱ्या मनमोहनांनी कपाळावर केशरी गंधाचा सुंदर तिलक लावलेला असून गळ्यामध्ये वनमाला धारण केली आहे. तितूनयेणारा तुळशीचा दिव्य गंध आणि मधुर मधन यांनी धुंद होऊन गुंग्यांच्या झुंडी उच्च स्वराने मधुर गुंजारव करीत असतात.त्या गुणगुणण्याचा आदर करीत त्यांच्या स्वरात स्वर मिळवून जेव्हा ते आपली बासरी बाजूला लागतात ,त्यावेळी ते मधुर संगीत ऐकून सरोवरात राहणाऱ्या सारस , हंसवगैरे पक्षांचे चित्त सुद्धा मोहून जाते .ते शामसुंदराजवळ येऊन बसतात आणि डोळे बंद करून गुपचूप चित्त एकाग्र करून ते संगीत ऐकू लागतात .

सहबलः(स्) स्रगवतं(म्)सविलासः(स्),

सानुषु* क्षितिभृतो व्रजदेव्यः ।

**हर्षयन् यर्हि वेणुरवेण,**

**जातहर्ष उपरम्भति विश्वम् ॥ 12॥**

स्रगवतं(म्)+ सविलासः(स्),क्षिति+ भृतो, वेणु+ रवेण

**महदतिक्रमणशं(ङ्)कितचेता,**

**मन्दमन्दमनुगर्जति मेघः ।**

**सुहृदमभ्यवर्षत् सुमनोभिश्-**

**छायया च विदधत् प्रतपत्रम् ॥ 13॥**

महदति+ क्रमणशं(ङ्)+ कितचेता, मन्द+ मन्द+ मनुगर्जति, सुहृदमभ्+ यवर्षत्

हे व्रजदेवींनो!शामसुंदर जेव्हा फुलांची कुंडले कानात घालूनबलरामांसह आनंदाने पर्वत शिखरांवर उभे राहून सगळ्या जगाला आनंदित करीत बासरीच्या मधुर आवाजानेसगळे विश्व भरून टाकतात ,त्यावेळी मेघ बासरीच्या तानांबरोबर त्यांच्या वेणुवादनात व्यत्यय न येईल ,अशा बेताने हळूहळू गर्जना करून त्यांना साथ देतात.शिवाय स्वतः सारखाच वर्ण असलेल्या घनश्यामांना ऊन लागू नये म्हणून ते त्यांच्या मस्तकावर सावली धरतात ,त्यांचे छत्र होतात .तसेच बारीक तुषार यांच्या रूपाने जणू दिव्य पुष्पांचा वर्षाव करतात .

**विविधगोपचरणेषु विदग्धो,**

**वेणुवाद्य उरुधा निजशिक्षाः ।**

**तव सुतः(स्) सति यदाधरबिम्बे,**

**दत्तवेणुरनयत् स्वरजातीः ॥ 14॥**

विविध+ गोप+ चरणेषु ,यदा+ धरबिम्बे ,दत्तवेणु+ रनयत्

**सवनशस्तदुपधार्य सुरेशाः(श्),**

**शक्रशर्वपरमेष्ठिपुरोगाः ।**

**कवय आनतकन्धरचित्ताः(ख्),**

**कश्मलं(यँ) ययुरनिश्चिततत्त्वाः ॥ 15॥**

सवनशस्+ तदु+ पधार्य, शक्रशर्व+ परमेष्ठि+ पुरोगाः,

आनत+ कन्ध+ रचित्ताः(ख्),ययु+ रनिश्चित+ तत्त्वाः

यशोदा माते !तुझा पुत्र गोपाळांबरोबर खेळ खेळण्यात निपुण आहे .तसेच अनेक प्रकारे बासरी वाजविणे ते स्वतःच शिकले आहेत .जेव्हा तोंडल्यासारख्या लाल ओठांवर बासरी ठेवून ते अनेक राग रागिनी वाजवू लागतात त्यावेळी ते ऐकून ब्रह्मदेव ,शंकर ,इंद्र इत्यादी सर्वज्ञ असणारे मोठमोठे

देवसुद्धा त्या राग रागिनी ओळखू शकत नाहीत .ते इतके मोहित होऊन जातात की,त्यांचे चित्त वेणुनादात तल्लीन होऊन जाते,मस्तक नम्र होते आणि ते आपली शुद्ध हरवून बसतात .

**निजपदाब्जदलैर्ध्वजवज्र-**

**नीरजां(ङ्)कुशविचित्रललामैः ।**

**व्रजभुवः(श्) शमयन् खुरतोदं(वँ),**

**वर्ष्मधुर्यगतिरीडितवेणुः ॥ 16॥**

निजपदाब्+ जदलैर्+ ध्वज+ वज्र ,

नीरजां(ङ्)+ कुशविचित्र+ ललामैः, वर्ष्म+ धुर्यगति+ रीडित+ वेणुः

**व्रजति तेन वयं(म्) सविलास,**

**वीक्षणार्पितमनोभववेगाः ।**

**कुजगतिं(ङ्) गमिता न विदामः(ख्),**

**कश्मलेन कबरं(वँ) वसनं(वँ) वा ॥ 17॥**

वीक्षणार्+ पितमनो+ भववेगाः

ज्यांच्या तळव्यांवर ध्वज ,वज्र ,कमळ ,अंकुश इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण सुंदर चिन्हे आहेत,अशा आपल्या चरण कमलांनी ते गाईच्या खुरांनी खोदल्या गेलेल्या व्रजभूमीचे दुःख नाहीसे करतात .तसेच गजराजाप्रमाणे चालत जेव्हा ते बासरी वाजवतात ,तेव्हा त्यांचा तो बासरीचा आवाज ,ते मोहक चालणे आणि त्यांचे ते विलास पूर्ण पहाणे आमच्या हृदयात प्रेम भाव वाढविता त .आम्ही त्यावेळी इतक्या मोहित होऊन जातो की ,झाडांसारखी आमची स्थिती होते .त्यावेळी आम्हाला केसांची किंवा वस्त्रांची शुद्ध ही राहात नाही .

**मणिधरः(ख्) क्वचिदागणयन् गा,**

**मालया दयितगन्धतुलस्याः ।**

**प्रणयिनोऽनुचरस्य कदां(म्)से,**

**प्रक्षिपन् भुजमगायत यत्र ॥ 18॥**

क्वचिदा+ गणयन्, दयित+ गन्ध+ तुलस्याः, प्रणयिनोऽ+ नुचरस्य

**क्वणितवेणुरववं(ञ्)चितचित्ताः(ख्),**

**कृष्णमन्वसत कृष्णगृहिण्यः ।**

**गुणगणार्णमनुगत्य हरिण्यो,**

गोपिका इव विमु*क्तगृहाशाः ॥ 19॥

क्वणित+ वेणु+ रववं(ञ्)+ चितचित्ताः(ख्), कृष्ण+ मन्+ वसत,

गुणगणार्+ णमनुगत्य, विमुक्त+ गृहाशाः

जिचा वास त्यांना अतिशय प्रिय आहे,अशी तुळशीची माळ गळ्यात घालून जेव्हा ते मण्यांच्या माळेने गाई मोजता मोजता एखाद्या प्रिय मित्राच्या गळ्यात हात टाकून बासरीही वाजवतात ,त्यावेळी बासरीच्या त्या मधुर स्वरांनी चित्त हरवलेल्या काळविटांच्या माद्या आम्हा गोपिन प्रमाणे घराची अभिलाषा सोडून गुणसागर 'नंदनंदनालाच वेढून राहतात .

कु*न्ददामकृतकौतुकवेषो,

गोपगोधनवृतो यमुनायाम् ।

न*न्दसूनुरनघे तव व*त्सो,

नर्मदः(फ्) प्रणयिनां(वँ) विजहार ॥ 20॥

कुन्ददा+ मकृत+ कौतुकवेषो, गोप+ गोध+ नवृतो ,नन्दसू+ नुरनघे

म*न्दवायुरुपवात्यनुकूलं(म्),

मानयन् मलयज*स्पर्शेन ।

व*न्दिन*स्तमुपदेवगणा ये,

वाद्यगीतबलिभिः(फ्) परिव*व्रुः ॥ 21॥

मन्द+ वायुरुप+ वात्य+ नुकूलं(म्),मलय+ जस्पर्शेन ,

वन्दिनस्+ तमुप+ देवगणा, वाद्य+ गीत+ बलिभिः(फ्)

हे पुण्यशील यशोदा माते!तुझा बाळ कुं दांचा हार गळ्यात घालून व कौतुकास्पद वेश धारण करून गोपालांसह गाईंच्या बरोबर यमुनेच्या काठी आपल्या मित्रांना आनंद देत खेळू लागतो.त्यावेळी तेथे मलय पर्वतावरील चंदनाने सुगंधित झालेला मंद वारा वाहून तो तुझ्या लाडक्या ची सेवा करतो आणि गंधर्व इत्यादी उपदेवता ,भाटान प्रमाणे गाऊन -वाजवून त्याला संतुष्ट करतात .तसेच अनेक प्रकारचे नजराने देऊन त्याला सगळीकडून वेढून त्याची सेवा करतात .

व*त्सलो व्रजगवां(यँ) यदग*ध्रो,

वन्द्यमानचरणः(फ्) पथि वृ*द्धैः ।

कृत्स्नगोधनमुपोह्य दिनान्ते,

गीतवेणुरनुगेडितकीर्तिः ॥ 22॥

वन्द्यमा+ नचरणः(फ्),कृत्स्न+ गोध+ नमुपोह्य ,गीत+ वेणुरनु+ गेडित+ कीर्तिः

**उत्सवं(म्) श्रमरुचापि दृशीना-**

**मुन्नयन् खुररजश्छुरितस्रक्।**

**दित्सयैति सुहृदाशिष एष,**

**देवकीजठरभूरुडुराजः॥ 23॥**

खुर+ रजश्+ छुरित+ स्रक्, देवकी+ जठरभू+ रुडुराजः

व्रजातीलगाईंवर गोवर्धन घरांचे अतिशय प्रेम आहे;म्हणून तर त्यांनी गोवर्धन पर्वत उचलून धरला होता .संध्याकाळ झाली आहे .आता ते सगळ्या गोधनाला वळवून घेऊन येतच असतील .वाटेत ब्रह्मदेवादी वयोवृद्ध ,ज्ञानवृद्ध त्यांच्या चरणांना प्रणाम करीत असतील .आता बासरी वाजवीत ते येऊ लागले आहेत आणि गोपाल त्यांच्या कीर्तींचे गायन करीत आहेत .पहा ना !गाईंच्या खुरांनी उडालेली धूळ वनमालेवर बसली आहे.ते दिवसभर फिरून फिरून दमले असले तरीसुद्धा त्या श्रमांच्या सौंदर्याने ही आमच्या डोळ्यांना किती आनंद देत आहे बरे !हे देवकी पुत्र कृष्ण चंद्र अम्मा प्रियजनांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीच आमच्याकडे येत आहेत .

**मदविघूर्णितलोचन ईषन्,**

**मानदः(स्) स्वसुहृदां(वँ) वनमाली ।**

**बदरपाण्डुवदनो मृदुगण्डं(म्),**

**मण्डयन् कनककुण्डललक्ष्म्या ॥ 24॥**

मदविघूर्+ णित+ लोचन ,बदर+ पाण्डु+ वदनो, कनक+ कुण्डल+ लक्ष्म्या

**यदुपतिर्द्विरदराजविहारो,**

**यामिनीपतिरिवैष दिनान्ते ।**

**मुदितवक्त्र उपयाति दुरन्तं(म्),**

**मोचयन् व्रजगवां(न्) दिनतापम् ॥ 25॥**

यदुपतिर्+ द्विर+ दराज+ विहारो, यामिनी+ पति+ रिवैष, मुदि+ तवक्त्र

सखे !ते पहा !त्यांचे सुंदर डोळे काहीसे इकडे तिकडे पाहात आहेत .गळ्यात वनमाला डोलत आहे .सोन्याच्या कुंडलांच्या कांतीने त्यांचे कोमल गाल शोभिवंत दिसत आहेत .त्यामुळेच पिकलेल्या बोराप्रमाणे मुख कमल पिवळसर दिसत आहे .आपल्या बांधवांना व इष्ट मित्रांना मान देणारे श्रीकृष्ण आपल्या गजराजासारख्या दौलदार चालीने या संध्याकाळच्या वेळी व्रजातचअसलेल्या गाईंचा आणि आमचा ,दिवसभरातील असह्यविरहताप नाहीसा करण्यासाठी ,दिवसाची उष्णता दूर करणाऱ्या चंद्राप्रमाणे जवळ येऊ लागले आहेत .

**श्रीशुक उवाच**

**एवं(वँ) व्रजस्त्रियो राजन्, कृष्णलीला नु गायतीः ।**

रेमिरेऽहः(स्)सु तच्चित्तास्- तन्मनस्का महोदयाः ॥ 26॥

तच्+ चित्तास्

श्री शुकाचार्य म्हणतात - राजा !कृष्णमय झालेल्या भाग्यवान गोपी जेव्हा श्रीकृष्ण दिवसा वनात जात,तेव्हा त्या त्यांचेच चिंतन करीत आणि त्यांच्याच लीलांचे गायन करीत त्यातच रममान होऊन जात .

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)

दशमस्कन्धे पूर्वार्धे वृन्दावनक्रीडायां(ङ्)

गोपिकायुगलगीतं(न्) नाम पञ्चत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः॥

